


दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : २०० ● पुणे ● रविवार, दि. २२ जून २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

## ठळक बातम्या

### खिशातील १५ हजार हिसकावले

पिंपरी (आरंभ पर्व): 'आमच्या बहिणीचे आधार कार्ड तुम्ही घेतले आहे', असे म्हणून आधार कार्डच्या बहाण्याने जवळ येत एकाच्या पॅन्टच्या खिशात हात घालून १५ हजार रुपये काढून घेण्यात आले, तसेच शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. ही घटना शुक्रवारी (दि. २०) मध्यरात्री तीनच्या सुमारास गांधीनगर येथील लोखंडे सभागृहाजवळ घडली. याबाबत मोहम्मद शाहनवाज आफताब आलम (वय २३, रा. कदम चाळ, गांधीनगर, पिंपरी) यांनी संत तुकारामनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून पोलिसांनी आधी अनोळखींविरोधात गुन्हा दाखल केला होता. मात्र, काही तासांतच तीन संशयितांना शोधून अटक केली.

### लुबाडणारे दोन पोलिस अंमलदार निलंबित

पुणे(आरंभ पर्व): नागरिकांच्या मदतीसाठी कमी वेळेत पोहोचता यावे यासाठी पोलिस ठाणे स्तरावर मोबाईल व्हॅन देण्यात येतात. या व्हॅनद्वारे हद्दीत गस्त घालून गुन्ह्यांना आळा घालावा, असा यामागचा हेतू असतो. पण, मोबाईल व्हॅनवर नेमलेले पोलिस कर्मचारीच रात्री लोकांना अटक करण्याची धमकी देऊन, लोकांच्या तक्रारी असल्याचे खोटे सांगून लुबाडत असल्याचा प्रकार समोर आला. या घटनेनंतर पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे यांनी डेक्कन पोलिस ठाण्यातील दोन पोलिस अंमलदारांचे निलंबन केले. गणेश तात्यासो देसाई आणि योगेश नारायण सुतार अशी या निलंबित पोलिस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. गणेश देसाई याला १७ जून रोजी रात्रपाळीसाठी मोबाईल व्हॅनवर चालक म्हणून तर, योगेश सुतार याला बालगंधर्व बीट मार्शल म्हणून नेमणूक दिली होती. त्यानंतर डेक्कन पोलिस ठाण्यात एका तक्रार अर्ज आला. त्या अर्जाच्या चौकशीनंतर ही कारवाई झाली.

### ठेकेदाराचे बंदुकीच्या धाकावर अपहरण

छत्रपती संभाजीनगर (आरंभ पर्व): एमआयटी महाविद्यालयात लँड स्केपिंग डिझायनिंग करण्यासाठी पुण्याहून आलेला ठेकेदार बीड बायपासवर लघुशंकेसाठी थांबल्यानंतर तीन आरोपींनी पिस्टल, चाकूचा धाक दाखवून फिर्यादीच्याच गाडीत बसवून अपहरण केले. बीड बायपासवरून चारचाकीत मारहाण करीत दौलताबाद भागात नेत त्यांच्याजवळचे ३५ हजार आणि फोन पेवर पैसे मागवून घेत ६९ हजार व सोन्याची बाळी, असा ऐवज लुटला. ही घटना १८ जूनच्या रात्री १२ वाजेच्या सुमारास घडली. दरम्यान, गुन्हे शाखेने या टोळीचा पर्दाफाश केला असून, तिघांना बेड्या ठोकल्या आहेत. अक्षय ऊर्फ भैया रमेश वाहूळ (२४, रा. बावनघर, सातारा परिसर), कुणाल गौतम जाधव (२६, रा. अयोध्यानगर, एन ७, सिडको) आणि विनोद सुभाष शिंदे (२१, रा. गरमपाणी), अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. अक्षयविरुद्ध ११, कुणालविरुद्ध ७ आणि विनोदवर १ गुन्हा दाखल आहे. अक्षयवर ३ वेळा एमपीडीए व १ वेळा हद्दपारीची कारवाई झालेली आहे, अशी माहिती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संभाजी पवार यांनी दिली.अजित उत्तम जाधव (३३, रा. चाकण रोड, आळंदी, जि. पुणे) असे अपहरण झालेल्या डिझायनिंग ठेकेदाराचे नाव आहे.

# मनपाची कारवाई : मालमत्ताधारकांना दिल्या नोटिसा

## मुकुंदवाडीत सोमवारी पाडापाडी, दीडशेवर मालमत्ता काढणार; लगेचच सर्व्हिस रोडचे काम

**छत्रपती संभाजीनगर(दै. आरंभ पर्व)**

जालना रस्त्यावरील मुकुंदवाडी येथे तब्बल २२९ अतिक्रमणे काढल्यानंतर महापालिकेने रहिवासी मालमत्ताधारकांना २ दिवसांचा वेळ दिला आहे. त्याबाबत शनिवारी घोषणा करून अतिक्रमणे काढून घेण्याचे निर्देश दिले आहेत. यादरम्यान स्थानिक व्यापाऱ्यांनी कारवाईला विरोध दर्शवला. मात्र शुक्रवारी झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर नागरिक आणि व्यापाऱ्यांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घेण्यास सुरुवात केली. सोमवारी सकाळपासून कारवाईला सुरुवात होईल. दीडशेहून अधिक अतिक्रमणे हटवण्यात येणार आहेत. अतिक्रमणे काढल्यानंतर लगेचच सर्व्हिस रोडचे काम सुरू करण्यात येणार आहे. बीड बायपास रस्त्यावर मार्किंग करून खांब लावण्यात आले आहेत. त्याप्रमाणे जालना रस्त्यावरदेखील



खांब लावण्यात येणार आहेत. शनिवारी मनपाच्या कर्मचाऱ्यांनी मार्किंग केल्याची माहिती मनपाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

### आरोपी सीसीटीव्हीत कैद

आरोपींना सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे ताब्यात घेतले आहे. आरोपींकडून दीड लाखाचा ऐवज हस्तगत करायचे आहे. आरोपींनी कोणाच्या सांगण्यावरून दरोडा टाकला याचा तपास करायचा आहे, असा युक्तिवाद सहायक सरकारी वकील सविता हिवराळे यांनी केला.

### टीडीआर देणार

महापालिकेची बांधकाम परवानगी किंवा सर्व कागदपत्रे नागरिकांनी मनपामध्ये सादर करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. या नागरिकांची कागदपत्रे तपासून त्यांना मनपाकडून टीडीआर (ट्रान्सफर ऑफ डेव्हलपमेंट राइट) देण्यात येणार आहे.

शुक्रवारी कारवाईपूर्वी दुकानातील सामान काढण्यासाठी महापालिकेने वेळ दिला नाही. यामुळे कारवाईदरम्यान दुकानांखाली सामान दबून मोठे नुकसान झाले. शनिवारी दिवसभर हे दबलेले सामान बाहेर काढणे सुरू होते. पत्रे, लोखंडी अँगल जमा करून भंगारमध्ये विकण्यासाठी दुकानदारांची धडपड सुरू होती.

## उजनीत वाळूउपशाच्या चार बोटी उद्ध्वस्त

**इंदापूर (दै. आरंभ पर्व)**

उजनी पट्ट्यातील इंदापूर तालुक्यातील शहा, कांदलगाव, माळवाडी या भागात अवैधरीत्या वाळूउपसा करणाऱ्या सुमारे ४० लाख रुपये किमतीच्या चार बोटी इंदापूर महसूल पथकाने कारवाई करीत उद्ध्वस्त केल्या. इंदापूरसह माढा आणि माळशिरस तालुक्यातील उजनी पट्ट्यातील आणि भीमा नदीपात्रातील अनेक भागांमध्ये वाळूमाफियांनी मोठ्या प्रमाणावर अवैध वाळूउपसा सुरू केला होता. या पार्श्वभूमीवर पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, बारामतीचे उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर यांच्या मार्गदर्शनाखाली इंदापूरचे तहसीलदार जीवन बनसोडे, नायब तहसीलदार अविनाश डोईफोडे, मंडळ अधिकारी औदुंबर शिंदे, ग्राममहसूल अधिकारी अशोक पोळ, कल्याणसिंह



डुलत, धनाजी भोसले, राजश्री ढमे, पोलिस पाटील अरुण कांबळे, सुनील राऊत, प्रदीप भोई, बाळासाहेब कडाळे, मल्हारी मखरे यांचे पथकाने उजनी धरण पट्ट्यातील शहा, कांदलगाव व माळवाडी या ठिकाणी बेकायदेशीर वाळू उत्खनन करणाऱ्या तीन मोठ्या व एक छोटी बोट, अशा एकूण चार बोटी स्पोटकच्या साह्याने नष्ट करीत पाण्यात बुडविल्या.

## पावसाचा जोर वाढणार, कमाल तापमानात होणार किंचित घट



### असा आहे पावसाचा अंदाज

पुणे आणि परिसरात रविवारी (ता. २२) कमाल तापमानात दोन अंश सेल्सिअसने घट होणार असून, ते २७ अंश सेल्सिअस आणि किमान तापमान २३ अंश सेल्सिअस नोंदविण्यात येणार आहे. आकाश अंशतः ढगाळ राहणार असून, हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. सोमवारी (ता. २२) कमाल तापमान स्थिर राहणार असून ते २७ अंश सेल्सिअसपर्यंत नोंदविले जाईल. आकाश अंशतः ढगाळ राहून हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेल्या दोन दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली आहे. कमाल तापमानात वाढ झाल्याने पुणेकर उकाड्याने हैराण झाले होते. मात्र पुढील तीन ते चार दिवसांत कमाल तापमानात किंचित घट होणार असून, पावसाचा जोर वाढणार असल्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे.

पुणे आणि परिसरात गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ हवामान होते. पावसाने काहीशी विश्रांती घेतल्यामुळे उकाड्यात वाढ झाली. शनिवारी (ता. २१) सकाळी ढगाळ वातावरण, तर दुपारी कडक ऊन पडले होते. त्यामुळे बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी आणि मंदिरांमध्ये दर्शनासाठी वारकऱ्यांसह नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. मात्र सायंकाळी सहाच्या सुमारास शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगरांत हलक्या पावसाने हजेरी लावली. यामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. पावसापासून वाचण्यासाठी त्यांना बसथांब्यांचा, दुकानांचा तसेच झाडांचा आसरा घ्यावा लागला.

पुढील दोन दिवसांत नैऋत्य मॉन्सून अरबी समुद्राच्या उर्वरित भागांमध्ये, राजस्थानच्या काही अधिक भागांमध्ये, पश्चिम उत्तर प्रदेशच्या उर्वरित भागांमध्ये, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मीर-गिलगिट-बाल्टिस्तान-मुझफ्फराबादच्या काही भागांमध्ये तसेच लडाखच्या काही अधिक भागांमध्ये पुढे सरकण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे. तसेच दक्षिण-पश्चिम बिहार आणि लगतच्या परिसरात कमी दाबाचे क्षेत्र कायम आहे. राजस्थान आणि लगतच्या परिसरात सरासरी समुद्रसपाटीपासून १.५ किलोमीटर उंचीवरील वरच्या हवेतील चक्रिय प्रणाली कायम आहे.






# अरण्यातले वनऋषी





ज्येष्ठ साहित्यिक आणि अरण्यऋषी असे ज्यांना आदराने नाव दिलेले होते असे मारूती चितमपल्ली यांना वयाच्या ९३ व्या वर्षी देवाज्ञा झाली. ९३ वर्षे हे काही लहान-सहान आयुष्य नव्हे. पण त्या आयुष्यात हा माणूस पक्षी आणि प्राण्यांचा मित्र होता आणि त्यांचा अभ्यासक होता. त्यासाठी त्यांनी वनक्षेत्रपाल नोकरी करत असताना आपले आयुष्य या आपल्या मुक्या मित्रांसाठी वेचले आणि लोकांना प्राणी आणि पक्ष्यांची महती सांगितली. नुसती सांगितलीच नव्हे तर लोकांमध्ये आवड निर्माण व्हावी म्हणून काम केले. त्यांना अरण्यऋषी म्हटले गेले. पण ते खरोखरच अरण्यातील तपस्वी होते आणि त्यांनी या आपल्या मुक्या मित्रांसाठी आयुष्यभर खूप काही केले आणि त्यांचा अभ्यास केला. चितमपल्ली यांनी अनेक पुस्तके लिहिली आणि त्यांचे 'चकवाचांदण' असो किंवा 'नवेगाव बांधचे दिवस' असो, जंगलातील एक विलक्षण अनुभूती देते. चितमपल्ली यांनी लौकिकार्थाने वानिकी विद्या शिकून सरकारी नोकरी केली आणि अखेरपर्यंत ते वन्य जीवांसाठी जगले. सोलापूर येथे जन्मलेले चितमपल्ली यांनी आपले उर्वरित जीवन विदर्भात घालवले आणि विदर्भातील जंगलांत त्यांनी आयुष्यातली उमेदीची वर्षे घालवली. त्यांनी केवळ वन खात्यात नोकरी केली नाही, तर संस्कृत पाठशाळेत अध्ययनही केले आणि जर्मन आणि रशियन भाषांचा अभ्यासही केला. पण त्यांचे जीवन वनाधिकारी म्हणून कार्य करण्यासाठी वेचले आणि त्यात त्यांनी महाराष्ट्राला जंगल वाचायचे कसे हे शिकवले.

कर्नाळा पक्षी अभयारण्य, मेळघाट प्रकल्प आणि नवेगाव येथील प्रकल्पांच्या विकासात त्यांचे योगदान आहे. पण त्यांची ओळख आहे ती म्हणजे निसर्ग आणि पर्यावरणाशी नाळ जोडलेला माणूस म्हणून आणि हीच त्यांची ओळख शेवटपर्यंत कायम होती. चितमपल्ली यांच्या आईने त्यांना प्रथम जंगलावर प्रेम करायला शिकवले. १९६० मध्ये महाराष्ट्रात त्यांची वनाधिकारी म्हणून नियुक्ती झाल्यावर त्यांनी महाराष्ट्रातील जंगलाचा अभ्यास केला आणि इतरांनाही शिकवला. त्यांचे पहिले वनाधिकारी म्हणून दशक कोकणात गेले, ज्यावेळी तेथे कोणतेही राष्ट्रीय उद्यान अथवा अभयारण्य नव्हते. पण त्यांचा अभ्यास आणि निसर्गाचे वाचन खरे सुरू झाले ते नवेगाव येथे नियुक्ती झाल्यावर आणि तेथील माधवराव पाटील यांना भेटल्यावर. त्यांनी साहित्यात ही सारी पात्रे अजरामर केली आहेत. माधवराव पाटील हे तर साधे शिकारी होते. पण त्यांना या अरण्यऋषीचा सहवास घडला आणि ते जंगलाचे अभ्यासक बनले. महाराष्ट्रातील रहिवाशांमध्ये जंगले लोकप्रिय करण्याचे श्रेय निःसंशय चितमपल्ली यांच्याकडेच जाते. कारण त्यांच्यामुळेच आज लोक जंगलाकडे वळले आहेत आणि लोकांत जंगले पाहण्याची आवड निर्माण झाली आहे. साहित्यिक म्हणून त्यांचे श्रेय प्रचंड आहे आणि त्याचे पहिले पुस्तक 'पक्षी जाय दिगंतरा.' हे आले तेव्हा ते बेस्ट सेलर ठरले. तेव्हा हा कोण नवीन लेखक आला आहे असा प्रश्न मान्यवर साहित्यिकांना पडला होता. नंतर चितमपल्ली हे सर्वपरिचित झाले आणि ते महाराष्ट्रात लोकप्रिय लेखक बनले. त्यांच्या पुस्तकांनी नवीन शैली सुरू केली आणि नवीन लेखकांना प्रोत्साहन दिले असे तज्ज्ञांचे मत आहे. हा माणूस कायम जंगलात वास्तव्याला असायचा आणि त्यामुळे त्यांचे जीवन जंगलातील हवेने, तेथील ताज्या घटनांनी समृद्ध झालेले होते आणि त्यांच्या नियमित परिघाला समृद्ध करणारा अनुभव देणारा लेखक जन्माला आला होता.

साहित्यिक या दृष्टीने चितमपल्ली यांचे जीवन, लेखन आणि अनुभव हे इंग्रजी लेखकाच्या जवळ जातात. कित्येक नामवंत लेखक असे आहेत की, त्यांनी आपल्या लेखनासाठी चाकोरीतील आयुष्य सोडले आहे आणि नवीन आयुष्य सुरू केले. चितमपल्ली त्यातच गणले जातात. त्यांनी आयुष्यभर जंगलातील माणूस म्हणून जगण्यात समाधान मानले आणि तरीही त्यांनी कधीही कमीपणा मानला नाही. चितमपल्ली यांनी महाराष्ट्राला जंगल वाचायला शिकवले असे जे म्हटले ते या अर्थाने. ते कित्येक वेळा पक्ष्यांच्या जीवनक्रमाचा अभ्यास करत असत आणि त्यांच्या नोट्स घेत असत. त्यातून त्यांची अनेक पुस्तके जन्माला आली. चितमपल्ली हे सरकारी नोकरी करत राहून व्रतस्थ होते आणि त्यांनी पक्षी कोश लिहिला तेव्हा त्यात ४०० हून अधिक पक्ष्यांचा त्याच्या स्थलांतराचा अभ्यास त्यात आहे. त्यांची एक खंत होती ती म्हणजे आजचे वनपाल पुरेसे निरीक्षण करत नाहीत आणि नोंदी घेत नाहीत. कित्येक वनपाल तर केवळ टाकणे याच एका हिशोबात काम करत असतात. अर्थात चितमपल्ली यांना जे पाहिजे होते ते आज कुणीही करणे शक्य नाही. कारण आज जो तो पगार आणि आपण इतकेच पाहत असतो. त्यामुळे चितमपल्ली खंत घेऊन गेले हे त्यांचे प्रारब्धच होते. महाराष्ट्रातील जंगलात ३६ वर्षे वास्तव्य करून अत्यंत समृद्ध अनुभव गाठीशी बांधून चितमपल्ली आज आपल्यात नाहीत. चितमपल्ली यानी केवळ जंगलावर पुस्तके लिहिली आहेत आणि त्यात 'रानवाटा' जसे आहे तसेच 'रातवा' आणि कितीतरी आहेत.

सोलापूरमध्ये झालेल्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. तरुणालाही लाजवेल अशा पद्धतीने आणि तडफेने काम करण्याची त्यांची प्रवृत्ती होती. त्यांनी 'पक्षी कोश' लिहिला तसेच 'वृक्ष कोश' लिहिण्याचे त्यांचे काम अर्धवट राहिले. अरण्य वाचन आणि सतत कार्यरत राहणारा ऊर्जावान असा हा लेखक होता. पण आज त्यांचा जीवनप्रवास काळाने संपवला आहे. त्यासाठी लागणारी माहिती मिळवण्यासाठी वाट्टेल ते कष्ट करण्याची तयारी त्यांची होती. त्यामुळे 'पक्षी कोश' त्यांच्याकडून लिहून झाला. त्यांच्या पुस्तकात प्राणी जीवनाबद्दल मनोरंजक माहिती आहे. चितमपल्ली यांच्या मते अनेक वृक्ष पावसाचे संकेत देतात. बिब्याच्या झाडाला फुले लागली,

# जागतिक योगदिनानिम्मित धायरीत "योग महोत्सव २०२५" संपन्न

## बापूसाहेब पोकळे यांचे संयोजन





**धायरी (दै. आरंभ पर्व)**

दिनांक 21/06/2025 पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेतून जागतिक योग दिनानिमित्त आयुष्य मंत्रालयातर्फे योग संगम 2025 चे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये धायरी टमरींड पार्क धायरी येथे योग दिन साजरा करण्यात आला. खडकवासला भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले. यावेळी मंडल अध्यक्ष रुपेश घुले, प्रभाग 42 अध्यक्ष पै.तुषार पोकळे, सरचिटणीस हेमेंद्र जी जोशी, परिसरातील नागरिक बंधू-भगिनी व तसेच भक्ती शक्ती योगसाधना वर्ग यामधील सर्व शिक्षक साधक उपस्थित होते. जागतिक योग दिवस प्राचीन भारतीय संस्कृतीचा वारसा असलेला योग हा प्रत्येक व्यक्तीसाठी उपयोगी आहे. योगाने फक्त शरीरस्वास्थ्यच नाही तर आत्मशुद्धी देखील होते. याच योगाचे महत्व ओळखून संपूर्ण जगाने आज त्याचा स्वीकार केला असून ही भारतासाठी अभिमानाची गोष्ट आहे. आपण सर्वांनी देखील आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहू आणि योग अंगिकारत एक सक्षम देश घडवू या असे आवाहन श्री. बापूसाहेब पोकळे यांनी यानिमित्त केले.

# पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी पालखीतळ सज्ज




**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी पालखीतळ सज्ज असुन हवेलीच्या अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते यांनी पालखी तळाची पाहणी केली

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळा ग्रामीण भागातील पहिल्या( दिनांक २२ जुन ) मुक्कामासाठी लोणी काळभोर कदमवाकवस्ती येथील पालखी तळावर पालखी येत आहे . त्यासाठी दोन्ही ग्रामपंचायती दिवस ,रात्र कष्ट घेत असुन महसूल विभाग ,पोलीस यंत्रणा ,आरोग्य विभाग ,महावितरण विभाग ,गँस एजन्सी विभाग असे अनेक विभाग पालखीच्या स्वागतासाठी तयार असल्याचे अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते यांनी सांगितले .

लोणी काळभोर कदमवाकवस्ती यांच्या वतीने युद्ध पातळीवर काम सुरू असून कुठल्याही परिस्थितीत वारकऱ्यांना त्रास होणार नाही याची दक्षता घेतली जाणार आहे. मोठे मोठे तंबू उभारण्याचे काम चालू असुन वारकऱ्यांना पाऊस लागु नये म्हणून काळजी घेतली जाणार आहे .

मुक्कामाच्या ठिकाणी पालखी सोहळा कालावधीत वारकऱ्यांसाठी मोफत वैद्यकिय सुविधा २४ तास उपलब्ध करुन देण्यात येणार असून पालखी मुक्काम, विसावा, स्वागत कक्ष आणि पालखी मार्गावर योग्य त्या ठिकाणी सी.सी. टि.व्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने ड्रोन कॅमेऱ्यांची व्यवस्थाही करण्यात येणार आहे. सोयीसुविधांचे नियोजन करण्यात आले आहे.

ठिक ठिकाणी दिशादर्शक फलक दर्शनी भागात लावण्यात येणार आहेत.

पिण्याचे पाणी, तातडीच्या वैद्यकीय सुविधेसाठी रुग्णवाहिका तसेच पालखी मुक्काम, वारकरी निवास आणि पालखी मार्गावर पुरेशा प्रमाणात फिरते शौचालयांची व्यवस्था करण्यात येणार आहे. वारक- यांकरिता पुरविण्यात येणा-या सुविधां संदर्भातील फलक लावण्यात येणार असल्याचे लोणी काळभोरचे सरपंच भरत काळभोर यांनी सांगितले .

लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी सांगितले की अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांच्या देखरेखीखाली पालखी सोबत , २ पोलीस उपायुक्त ,२सहाय्यक पोलीस आयुक्त ,९सहाय्यक पोलीस निरीक्षक ,२८ पोलीस उपनिरीक्षक ,२८१ अंमलदार असणार आहेत .चार ठिकाणी वॉंच पॉंइट उभारण्यात आले आहेत. त्यामध्ये लोणी स्टेशन ,पालखी तळ ,थेऊर फाटा ,कुंजीरवाडी येथे हे वॉंच पॉंइट असणार आहेत. या व्यतिरिक्त वाहतूक शाखेचे पोलीस पालखी साठी मार्ग सोयीस्कर करून देणार आहेत.

यावेळी अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते , लोणी काळभोरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे ,लोणी काळभोरचे सरपंच भरत काळभोर, कदमवस्तीचे माजी सरपंच चित्तरंजन गायकवाड ,उपसरपंच नासीर पठाण , गणेश कांबळे ,ग्रामपंचायत सदस्य अविनाश बडदे, नागेश काळभोर,तंटामुक्तीचे अध्यक्ष अभिजीत बडदे ,सोसायटीचे सदस्य रमेश भोसले ,पोलीस पाटील दादा पाटील , पोलीस पाटील प्रियंका भिसे , ग्रामसेवक अमोल गुळवे आदी उपस्थित होते.



# राजगुरू महाविद्यालयात योग प्रात्यक्षिकांचे आयोजन

## किरण खुडे

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात क्रीडा विभाग, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले.

योगा फॉर वन अर्थ, वन हेल्थ या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमात योग प्रशिक्षक सागर गाडे यांनी मार्गदर्शन केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ.शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ.एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

योगाभ्यासाचे महत्त्व सांगताना सागर गाडे म्हणाले की, योगामुळे ज्ञान व आरोग्य चांगले राहत असून सर्वच वयोगटातील व्यक्तींना योगसाधनेची गरज आहे. आपले मानसिक व शारीरिक आरोग्य चांगले राखण्यासाठी तसेच अनेक विकारांवर योगासने प्रभावी आहेत. त्यामुळे सर्वच व्यक्तींनी योगाभ्यास करणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांकडून त्यांनी योगासनांची प्रात्यक्षिके करून घेतली.

या कार्यक्रमाचे आयोजन डॉ.प्रतिमा लोणारी, डॉ. योगेश वाळुंज, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. योगेश मोहिते, प्रा. सारिका गोरे, प्रा. तानाजी पिंगळे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रतिमा लोणारी यांनी तर आभार प्रा. सारिका गोरे यांनी मानले.

# केदारनाथ सार्वजनिक वाचनालय आणि सामाजिक संस्थेच्यावतीने सत्कार



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

केदारनाथ सार्वजनिक वाचनालय आणि सामाजिक संस्थेतर्फे इयत्ता १० वी आणि १२ वी च्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ आयोजित करण्यात आला होता. संस्थेच्या या उपक्रमाचे रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने २५ गुणवंत विद्यार्थ्यांना २५ सायकली देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विभागावर पद्धतीने विद्यार्थ्यांची निवड करून प्रथम क्रमांकास सायकल व इतर विध्यार्थ्यांना विविध क्रीडा साहित्य, चषक, प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.पुणे शहर आणि ग्रामीण भागातील जवळ जवळ १००० विद्यार्थी यावेळेस उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार भिमराव तापकीर, भाजप पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे, प्रा. डॉ.सुधाकर जाधवर, पश्चिम हवेली वारकरी सेवा संस्थेचे ह.भ.प.सतिश बोडके यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रसिद्ध व्याख्याते प्रा. गणेश शिंदे सर आणि प्रेममूर्ती ह भ प नवनाथ महाराज लिमण यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सिंहगड रोड परिसरातील आय.एए.स परीक्षेत भारतात २६ वा तर महाराष्ट्रात २ रा आलेला शिवांश जागडे, पी.एस.आय. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सुमित जव्हेरी, महाराष्ट्र राज्य क्रिकेट असोसिएशनच्या १६ वर्षाखालील संघात निवड झालेला आयुष उभे, इंडियन नेव्ही परिक्षेत भारतात २७ वी आणि मुलींमध्ये ३ री आलेली नंदिनी वाईकर या विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. खडकवासला विधानसभा परिसरातील नांदेडकरांची दिंडी , नांदेडकर दिंडी, क्षत्रिय मराठा वारकरी दिंडी धायरी, ह.भ.प .गणपत जाधव महाराज बांगडेवाडी दिंडी, बनेश्वर पालखी सोहळा दिंडी, शिरवळकर दिंडी इत्यादी पंढरीच्या वारीत सहभागी असणाऱ्या दिंड्यांना पखवाज, रोख रक्कम, पिशव्या इत्यादी देऊन सन्मानित करण्यात आले. आपल्या प्रास्ताविकात संस्थेचे संस्थापक माजी नगरसेवक हरिदास चरवड यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली केवळ सामाजिक जाणीव भावनेपोटी आपण हा उपक्रम राबवत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. आम्ही काही मित्र एकत्र येऊन सुरु केलेल्या उपक्रमास २५ वर्ष होत असल्याने यावेळी त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी संस्थेतर्फे देण्यात येणारा आदर्श विद्यालय सिंहगड करंडक २०२५ हा पुरस्कार आंबेगाव बुद्रुक येथील उत्कर्ष प्राथमिक व माध्यमिक विद्यालय या शाळेला देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर. जे .अक्षय यांनी केले यावेळी खडकवासला भाजपा मा.अध्यक्ष सचिन मोरे , मा.नगरसेवक बाळासाहेब नवले, गंगाधर भडावळे, ज्ञानगंगा शाळेच्या संस्थापिका सौ.निकम मॅडम, उत्कर्ष शाळेच्या संस्थापिका शारदा चव्हाण, रामदास चरवड, रमाकांत देशमुख, बाबाजी चरवड, सुरेश कोळेकर, शंकर चोरगे, भास्कर कदम, जयसिंगराव जांभळ, रोहिदास हनमघर, शिवाजी येवले, धनंजय पोकळे, यशवंत लायगुडे, बाळासाहेब पोरे, अप्पा पोळेकर, शिवाजी पिसाळ, सुनील कंधारे, सचिन बदक, अतुल दांगट, सागर पोकळे, स्वप्निल वाघ, चंदन कड, प्रकाश लिम्हण, दत्तात्रय देशपांडे, अनिल चरवड, संदीप चरवड, अनंता बनकर, सुहास पवार, निलेश पवार, डॉ. विवेक काळे, पांडुरंग दळवी, सुनिल चरवड, संतोष डफळ , नागराज सावळेकर , संजय हाळबे, केदार जाधव, साईप्रसाद मोरे, चंद्रकांत पवळे, सुनिल कांबळे, पूनमताई चरवड, अश्विनी पवळे, छाया चरवड, वाबळेताई गौरीताई पवळे,जानवीताई जाधव, अनुराधा चरवड आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रेममूर्ती नवनाथ महाराज लिम्हण यांनी हरिदास चरवड यांच्या सामाजिक कार्याविषयी कौतुक व्यक्त केले. अशा या सामाजिक कार्यकर्त्यास आपण सर्वांनी कायमस्वरूपी पाठीशी राहावे अशी विनंती त्यांनी सर्वांना केली.

शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी पंचवीस वर्षे सामाजिक कार्य करणाऱ्या केदारनाथ संस्थेचे कौतुक व्यक्त करताना हरिदास चरवड यांनी पुढील 25वर्ष सामाजिक व राजकीय क्षेत्रात जबाबदारी स्वीकारण्याची तयारी ठेवावी. आम्ही त्यांना संधी देऊ असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर यांनी तुम्ही फक्त कायमस्वरूपी सामाजिक उपक्रम चालू ठेवावे. भविष्यात आपल्याला खूप काही संधी द्यायचे आहेत असा खंबीर पाठिंबा तापकीर यांनी व्यक्त केला.

# थोडक्यात



## नवले मनपा शाळेत योगदिन उत्साहात साजरा


**धायरी(आरंभ पर्व) : २१ जून आंतरराष्ट्रीय योगदिन कै. नारायणराव नवले प्राथमिक शाळा मनपा क्र. २०४ बी येथे अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. योगदिनाची सुरुवात योगाच्या प्रार्थनेने ध्यानाने करण्यात आली . सुरुवातीला योग दिन का साजरा करतात व त्याचे महत्त्व मुलांना मुख्याध्यापिका सौ. मानकर मॅडम यांनी सांगितले. योग दिनानिमित्त शाळेतील सहकारी शिक्षिका सौ कविता दराडे मॅडम यांनी मुलांना योगासने शिकवली व प्रात्यक्षिक करून घेतले. बैठे व उभे आसन प्रकार मुलांनी अतिशय छान कृती युक्त केले. शाळेतील सर्व मुलांनी व शिक्षकांनी योगदिनानिमित्त प्रात्यक्षिकात आनंदाने व उत्साहाने सहभाग नोंदवला. सदर योग दिनाच्या उत्तम आयोजनासाठी मुख्याध्यापिका सौ. सविता मानकर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली उपशिक्षक -भारती देशमुख, वैशाली रणधीर, कविता दराडे , प्रमिला तनपुरे, संजय हरपुडे , क्षितिजा साठे ,शर्मिला करंजावणे , श्रद्धा नाडकर्णी व शाळेतील सर्व शिक्षक, सेवक व बालवाडी शिक्षिका उपस्थित होते.**



## आषाढी पालखी : प्रसन्नदादा जगताप मित्र परिवाराकडून वृक्षारोपण

**हिंगणे (आरंभ पर्व) : श्री संत तुकाराम महाराज व श्री संत माऊली ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी प्रस्थान होत आहे. ह्या निमित्त हिंगणे खुर्द, सिंहगड रोड येथील विठ्ठल मंदिराच्या परिसरात, मुठा काठाने पालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण विषयक हा सुंदर उपक्रम राबविण्यात आला. ॲड. प्रसन्नदादा जगताप मित्र परिवार आणि पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या संयुक्त पुढाकाराने हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी स्वतः २१ मोठ्या झाडांचे रोपण केले आणि त्यांच्या संगोपनाची जबाबदारीही स्वीकारली. पालखीप्रेम, पर्यावरणप्रेम आणि सामाजिक भान यांचा सुंदर संगम या उपक्रमातून दिसून आला. यावेळी माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप, तसेच पुणे मनपाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.**

## कान्हेवाडी बुद्रुकच्या सरपंचपदी उर्मिला रुके बिनविरोध



**राजगुरूनगर (आरंभ पर्व) : कान्हेवाडी बुद्रुक (ता.खेड) गावच्या सरपंच पदी उर्मिला दत्ता रुके यांची बिनविरोध निवड करण्यात आली. बबन कोबल यांनी सरपंच पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागी सरपंचपदाची निवडणूक ग्रामपंचायतच्या सभागृहात घेण्यात आली. निवडणुक निर्णय अधिकारी तथा मंडलाधिकारी शितल शेवाळे यांनी निवडणुकीचे कामकाज पाहिले. निवडणूक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सरपंच पदासाठीसाठी उर्मिला रुके यांचा एकमेव अर्ज आल्याने निवड बिनविरोध झाल्याची घोषणा करण्यात आली. उर्मिला रुके यांचा यावेळी मावळते सरपंच बबन कोबल यांच्या सह इतर सदस्यांनी फेटा बांधून सन्मान केला. याप्रसंगी कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आताषबाजी करीत गुलाल उधळीत पारंपारिक वाद्याच्या गजरात गावातून मिरवणूक काढून आनंद व्यक्त केला.**

## थोडक्यात



### स्वीकृत नगरसेवक पदी चंद्रकांत कांबळे यांची निवड

सोलापूर (आरंभ पर्व) : माढा नगरपंचायतीचे स्वीकृत नगरसेवक म्हणून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे चंद्रकांत बाबुराव कांबळे यांची बिनविरोध निवड झाल्याचे पीठासन अधिकारी मंगळवेढा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चरण कोल्हे यांनी जाहीर केले. नगरसेवक मारुती पवार यांनी राजीनामा दिल्याने ही जागा रिक्त झाली होती या पदासाठी चंद्रकांत कांबळे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. त्यांच्या अर्जावर नगराध्यक्ष एडवोकेट मीनल साठे यांनी नामनिर्देशन पत्रावर सही केली होती. चंद्रकांत कांबळे यांची निवड झाल्याचे समजताच संपूर्ण माढा शहरामध्ये जल्लोष साजरा करण्यात आला. चंद्रकांत कांबळे हे माढा शहर परिसरातील प्रसिद्ध पैलवान कै. बाबुराव (आण्णा )कांबळे यांचे ते नातू आहेत ते नेहमी गावातील इतर कुठल्याही सामाजिक कार्यात ते सक्रिय असतात सर्वसामान्यांच्या अडचणी नेहमीच ते सोडवत असतात यांनी यापूर्वी माढा तंटामुक्तीचे अध्यक्षपद म्हणूनही काम पाहिले आहे सध्या त्यांच्याकडे सन्मती नागरी सहकारी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन देखील आहेत माढा शहरात चर्मकार समाजाचे प्रथम नगरसेवक म्हणून त्यांनी आज इतिहास रचला आहे. या निवडीबद्दल नगराध्यक्षा सौ मीनल ताई साठे माननीय दादासाहेब साठे उपस्थित सर्व नगरसेवक व नागरिकांनी त्यांचे निवडीबद्दल अभिनंदन केले.



### नारायणराव नवले प्राथमिक विद्यालयात नवीन वर्षाचे स्वागत

धायरी (आरंभ पर्व) : सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची सुरुवात आणि इयत्ता पहिली मधे नवीन प्रवेश घेणाऱ्या बालकांचे व त्यांच्या पालकांचे स्वागत कै नारायणराव नवले प्राथमिक विद्यालय मनपा शाळा क्रमांक २०४ बी व ५६ बी यांच्या संयुक्त विद्यमाने वडगाव खुर्द येथे अतिशय आनंददायी व उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. मुलांनी अतिशय आनंदाने शाळेच्या गेटमधून आत प्रवेश केला. प्रथमतः मुलांचे फूल व चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले व नंतर मान्यवरांच्या व पालक , शिक्षकांच्याहस्ते औक्षण करण्यात आले . मुलांच्या हाताचे व पायांचे वैविध्यपूर्ण कल्पनेत ठसे घेण्यात आले ज्यात मुले खूप खुश झाली. २०४ बी च्या मुख्याध्यापिका सौ. सविता मानकर मॅडम व ५६ बी च्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ सुमन गंथडे मॅडम यांनी या कार्यक्रमास उपस्थित असलेले मनपा पुणे शिक्षण मंडळातील सहायक प्रशासकीय अधिकारी क्रीडा विभाग मा. श्री भूषण बहिरे साहेब , डॉ. गीतांजली बोरुडे मॅडम, अधिव्याख्याता MSCERT पुणे, शा.शि संघटक श्री सचिन वाडकर सर , सामाजिक कार्यकर्ते मा. श्री सारंगदादा नवले यांचे स्वागत करुन प्रास्ताविक केले. उपस्थित मान्यवरांनी शाळेतील विद्यार्थ्यांना व पालकांना योग्य मार्गदर्शन करतानाच शाळेच्या प्रगतीविषयी समाधान व्यक्त केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मुलांना पाठ्यपुस्तके व खाऊ देण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा २०४ बी व ५६ बी च्या मुख्याध्यापक मानकर मॅडम व गंथडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व शिक्षक , बालवाडी शिक्षिका, सेवक वर्ग यांनी सहकार्य केले.

### मुख्यमंत्री ग्राम स्पर्धेत भाग घ्यावा

पुणे (आरंभ पर्व) : "स्वच्छ, सुंदर व प्लॅस्टिकमुक्त महाराष्ट्रासाठी ग्रामपंचायतींनी महत्त्वाची भूमिका निभवावी आणि शासनामार्फत लवकरच 'मुख्यमंत्री समृद्ध ग्राम स्पर्धा' राबविली जाणार आहे. त्यामध्ये सहभागी व्हावे. चालू वर्षी तीस लाख घरकुलांना मंजुरी दिली आहे. घरकुलाच्या अनुदानासाठी ६५ हजार कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत," अशी माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली. निर्मल वारीचे उद्घाटन तसेच, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान आणि महाआवास योजनेतील पुरस्कार वितरणप्रसंगी ते बोलत होते.

# नऱ्हेत भूपेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली चक्काजाम आंदोलन

## चार तास वाहतूक ठप्प | प्रशासनाच्या दुर्लक्षित धोरणाविरोधात संतप्त नागरिकांचा आवाज बुलंद

**श्री. लक्ष्मण साबळे, निवासी संपादक**



**नऱ्हे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे धायरी परिसरातील रस्त्यांची दुरवस्था, साचलेलं पाणी, ड्रेनेज समस्या, खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांची वाढती संख्या आणि पुणे महानगरपालिकेच्या उदासीन कारभाराविरोधात सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली आज मोठ्या प्रमाणात चक्काजाम आंदोलन करण्यात आलं.

कृष्णाईनगर येथे सकाळी सुरू झालेलं हे आंदोलन तब्बल चार तास चाललं, ज्यामुळे दोन्ही बाजूंनी वाहतूक पूर्णतः ठप्प झाली. रस्त्यावरील खड्ड्यांत साचलेल्या पाण्यात कागदी होड्या सोडून आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाचा निषेध व्यक्त केला.

भूपेंद्र मोरे यांनी याआधी खड्ड्यांत गुलाबाची झाडं लावून शांततेच्या मार्गाने प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, महानगरपालिकेने कोणतीही ठोस कारवाई केली नसल्यामुळे रस्त्यावर उतरून चक्काजाम करण्याची वेळ नागरिकांवर आली, असं त्यांनी यावेळी सांगितलं.

सुमारे पाच तासांनंतर पुणे मनपाचे अभियंता विजय वाघमोडे, उपायुक्त श्रद्धा पोतदार, तसेच अधिकारी निशिकांत छापेकर यांनी आंदोलनस्थळी भेट दिली. तातडीने समस्या सोडवण्याचं लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आलं.

या आंदोलनात सिंहगड रोड पोलीस निरीक्षक दिलीप दायगुडे, वाहतूक निरीक्षक राजकुमार बर्डे, तसेच मनपाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी राजाभाऊ जाधव, विठ्ठल सूर्यवंशी,मिलिंद मराठे, संजय सुर्वे, गणेश निंबाळकर, हरीश वैद्य , प्रशिक दारुंडे, लतिफ शेख, सुनील पडेर, सुरज दांगडे ,सुशील भागवत, विशाल खरात, बोराडे, अजय घारे, सोनाली नायर यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी आजचा इशारा गंभीरतेने घेतल्यास, भविष्यातील मोठ्या आंदोलनापासून बचाव होऊ शकतो. आता प्रशासनाच्या प्रत्यक्ष कृतीवरच सगळं अवलंबून आहे.

भूपेंद्र मोरे यांनी केलेल्या चक्काजाम आंदोलनानंतर महापालिका प्रशासन खडबडून जागे झाले. लागलीच कृष्णाई नगर भागातील ड्रेनेज लाईन झेट मशीनच्या मार्फत करण्यात आली.

मागील आठवड्यात भूपेंद्र मोरे यांनी रस्त्यावरील खड्ड्यात गुलाबाचे झाड लावून प्रशासनाला साकडे घातले होते.

### भूपेंद्र मोरे यांचा इशारा

"जर मागण्या लवकरात लवकर पूर्ण झाल्या नाहीत, तर पुढचं आंदोलन मुंबई-बेंगळूर महामार्गावर होईल."

- भूपेंद्र मोरे, सामाजिक कार्यकर्ते

### श्रद्धा पोतदार यांची प्रतिक्रिया

"भूपेंद्र मोरे यांच्या मागण्या जनहिताच्या असून, त्या तातडीने सोडवण्यासाठी आम्ही पावलं उचलणार आहोत. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठकीत याचा आढावा घेतला जाईल."

- श्रद्धा पोतदार, उपायुक्त, पुणे महानगरपालिका







## मंत्री भरत गोगावले यांची पूजा सर्वसामान्यच

### कोणताही अघोरी प्रकार नाही – तृप्ती देसाईंचा खुलासा





**श्री. लक्ष्मण साबळे, निवासी संपादक**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्याचे मंत्री भरत गोगावले यांच्या पूजा विधीवरून निर्माण झालेल्या वादावर सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी प्रतिक्रिया दिली आहे. "भरत गोगावले यांनी केलेली पूजा ही पारंपरिक पद्धतीने आणि सर्वसामान्य श्रद्धेनुसार करण्यात आलेली आहे. त्यामध्ये कोणताही अघोरी किंवा भीतीदायक प्रकार दिसून आलेला नाही," असे तृप्ती देसाई यांनी स्पष्ट केले. तृप्ती देसाई पुढे म्हणाल्या की, "कोणत्याही व्यक्तीने धार्मिक विधी करणं हा त्याचा वैयक्तिक अधिकार आहे. कोणत्याही पूजेवर केवळ अडथळा निर्माण करण्यासाठी आरोप लावणं योग्य नाही. भरत गोगावले यांना यामध्ये चुकीच्या

- **सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांचा भरत गोगावले यांना पाठिंबा**

पद्धतीने लक्ष्य करण्यात येत आहे."

या विधानामुळे सध्या चर्चेत असलेला पूजा प्रकार हा एका वेगळ्याच वळणावर गेला असून, यामुळे मंत्री गोगावले यांना थोडासा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. काही विरोधकांनी या पूजेवर टीका केली होती. मात्र, सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांचा पाठिंबा मिळाल्याने गोगावले यांचं समर्थन अधिक ठळक झालं आहे. राजकीय आणि सामाजिक वर्तुळात या वक्तव्याची चर्चा सुरु आहे. पूजा म्हणजे अंधश्रद्धा की श्रद्धा – हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरतो आहे.



## नांदेड शाळेत नवीन विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ संपन्न

### वृक्षारोपण करत दिला नवा संदेश

**नांदेड (दै. आरंभ पर्व)**

नांदेड मनपा प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच, विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या शालेय साहित्यांचे वितरण केले. शाळेचा पहिलाच दिवस असल्याने मुलांच्या चेहऱ्यावर आगामी शालेय वाटचालीबद्दलचा आनंद स्पष्ट दिसत होता. याप्रसंगी शालेय विद्यार्थ्यांना पर्यावरणाबद्दलची जागरूकता निर्माण व्हावी, याकरिता शाळेच्या परिसरात वृक्षारोपण केले. भाजपा मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील यांचे तर्फे खाऊ वाटप यावेळी करण्यात आले. नवीन विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राम रुचनभैरे , राम रुचनभैरे, भाजपा महिला आघाडीच्या अध्यक्ष रश्मीताई घुले, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व पालक व सिंहगड विभागाच्या पर्यवेक्षिका श्रीमती नंदा डोळस , श्री हेमेंद्र जोशी, ब्रह्मकुमारीच्या ललिता दीदी यांच्यासह विविध मान्यवर, पालक उपस्थित होते. मुख्याध्यापक श्री येवले सर व सर्व शिक्षक वृंद यांनी सर्वांचे आभार मानले. शिक्षकवृंद, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेची गुणवत्ता उंचावून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून उज्वल भवितव्य होईल. तसेच, या भावी पिढीला योग्य दिशा देऊन गावाची ओळख निर्माण करता येईल. असे मत यावेळी खडकवासला भाजपा मंडल अध्यक्ष रुपेश घुले पाटील यांनी व्यक्त केले.

यावेळी नांदेड़ सिटी ब्रम्हाकुमारी विश्वविद्यालय ध्यान केंद्र संचालीका ब्रम्हाकुमारी ललितादिदी,,सूर्यनाथा पैरामेडिकलचे डायरेक्टर उमा राय,विठ्ठल धर्माधिकारी,श्री हेमेंद्र जोशी, यांच्यासह विविध मान्यवर, पालक उपस्थित होते. मुख्याध्यापक श्री येवले सर व सर्व शिक्षक वृंद यांनी सर्वांचे आभार मानले. शिक्षकवृंद, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाळेची गुणवत्ता उंचावून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून उज्वल भवितव्य होईल. तसेच, या भावी पिढीला योग्य दिशा देऊन गावाची ओळख निर्माण करता येईल. असे मत यावेळी खडकवासला भाजपा मंडल अध्यक्ष रुपेश घुले पाटील यांनी व्यक्त केले.

## ज्येष्ठ साहित्यिक अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांचे निधन

**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**



**श्री. लक्ष्मण साबळे, निवासी संपादक**

सोलापूरचे ज्येष्ठ साहित्यिक आणि अरण्यऋषी म्हणून ओळख मिळवलेले मारुती चित्तमपल्ली यांचे बुधवारी सायंकाळी निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. नुकतेच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच अक्कलकोट रोडवरील निवासस्थानी साहित्यिक, पर्यावरणप्रेमी आणि मित्रपरिवाराचा मोठा जमाव जमला होता.

**मारुती चित्तमपल्ली :**

**अरण्यऋषी :** मारुती चित्तमपल्ली (जन्म : ५ नोव्हेंबर १९३२, सोलापूर) हे महाराष्ट्रातील प्रख्यात निसर्गप्रेमी, वन्यजीव संरक्षक आणि साहित्यिक होते. जंगलावरील त्यांच्या असीम प्रेमामुळे त्यांना "अरण्यऋषी" हे बिरूद लाभले होते.

**जीवन आणि कार्य :** शिक्षण आणि वनसेवा : त्यांनी स्टेट फॉरेस्ट सर्व्हिस कॉलेज, कोयंबतूर येथे वनशास्त्राचे शिक्षण घेतले. त्यानंतर ३६ वर्षांहून अधिक काळ त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या वन विभागात जबाबदारीची सेवा बजावली. कर्नाळा पक्षी अभयारण्य, नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा अभयारण्य आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्प यांसारख्या ठिकाणी त्यांनी प्रभावी कामगिरी बजावली.

वन्यजीव संरक्षणात योगदान : विस्थापित वन्यजीवांसाठी नागझिरा व मेळघाट येथे अनाथाश्रम उभारणीस त्यांनी पुढाकार घेतला.

भाषा ज्ञान : त्यांना संस्कृत, जर्मन, रशियनसह तब्बल १८ भाषांचे ज्ञान होते.

**साहित्यिक योगदान :** चित्तमपल्ली यांचे लेखन मुख्यतः मराठी भाषेत असून त्यात निसर्ग, जंगल, वन्यजीव आणि आदिवासी जीवन यांचा समृद्ध अनुभव प्रतिबिंबित होतो. त्यांच्या लेखनशैलीत वैज्ञानिक ज्ञान आणि सर्जनशीलतेचा सुंदर मिलाफ दिसतो.

मुख्य विषय : पक्षी, प्राणी, वृक्ष, जंगलातील गूढ गोष्टी, आणि आदिवासी संस्कृती हे त्यांच्या साहित्याचे गाभा राहिले आहेत.

मराठी भाषेचे योगदान : त्यांनी पक्षीविज्ञान व वन्यजीवाशी संबंधित अनेक संज्ञा प्रथमच मराठीत आणल्या. त्यामुळे मराठी शास्त्रीय भाषेचा समृद्धीकरण झाले.

चकवा चांदणं ही त्यांची आत्मकथा विशेष गाजली.

### प्रमुख साहित्यकृती

निलवंती, जंगलाचं देणं, घरट्या पलिकडे, रातवा, रानवाटा, प्राणीकोश, पक्षीकोश, सुवर्ण गरुड, निसर्गवाचन, शब्दांचे धन, मृगपक्षीशास्त्र, केशराचा पाऊस, आनंददायी बगळे

### पुरस्कार आणि सन्मान

पद्मश्री (२०२५) : भारत सरकारचा चौथा सर्वोच्च नागरी सन्मान.
विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार (२०१७) : महाराष्ट्र शासनातर्फे.
मराठी साहित्य संमेलन अध्यक्षपद (२००६) : सोलापूर येथे पार पडलेल्या संमेलनाचे अध्यक्ष.
मारुती चित्तमपल्ली यांनी आपले आयुष्य निसर्गाच्या सेवेस वाहिले. त्यांनी जंगलाचे केवळ संवर्धन केले नाही, तर त्याचा आत्मा आपल्या शब्दांतून मांडला. त्यांच्या जाण्याने मराठी साहित्यविश्व आणि निसर्गप्रेमी समाजात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.



# नऱ्हे झपाट्याने वाढले : नागरिकांना मात्र समस्यांनी वेढले



**नऱ्हे (दै. आरंभ पर्व)**

**पुणे महानगरपालिकेमध्ये जाऊनही नऱ्हे परिसरातील नागरिकांना आपण शहरात आलोय याचा काही अनुभव येत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. दैनिक आरंभपर्व टीम ने "नऱ्हे on the स्पॉट" सदराखाली नऱ्हेतील समस्याचा वेध जाणून घेतला. नागरिक, अधिकारी आणि राजकीय पक्षाचे पदाधिकारी यांच्याशी संवाद साधला. त्याचा हा इतिवृत्तांत**

गेल्या अनेक वर्षापासून नऱ्हे भाग सातत्याने चर्चेला येतो आहे. ह्या भागातील असलेल्या विविध शैक्षणिक संस्था व हॉस्पिटल यामुळे हा परिसर कायमस्वरूपी चर्चेत असायचा. मात्र नागरी सोयी सुविधांच्या अभावामुळे नऱ्हे गाव चर्चेत येते. कधी पाणीपुरवठा, रस्त्यावर वाहणारे ड्रेनेज, भयंकर ट्राफिक, इतर काही सोयी सुविधा चा अभाव यामुळे गड्या आपली ग्रामपंचायत बरी असा नागरिकांचा सुर उमटतो आहे. या भागातील सर्वच ठिकाणी अनेक समस्यांनी नागरिक ग्रासले आहेत. नऱ्हे ग्रामपंचायत अस्तित्वात असताना त्यावर ग्रामपंचायतीचे नियंत्रण होते त्यामुळे सर्व काही सुरळीत होते. तर पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झाल्यापासून चित्र झपाट्याने बदलले आहे.

**अपुरा पाणीपुरवठा :** नऱ्हे परिसरातील नागरिकांना अपुरा पाणीपुरवठा होतो आहे. अनेक भागात टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे.

पाण्याचे स्रोत आहेत मात्र नियोजन अभावी पाणीपुरवठा होत नाही असे नागरिकांचे म्हणणे आहे. यावर पाणीपुरवठा विभागाने नियोजनपूर्वक नियोजन करून शुद्ध पाणी देण्याची सोय करणे गरजेचे आहे.

**रस्त्यावर वाहणारे ड्रेनेज :** ह्या भागातील मानाजी नगर कृष्णाई नगर, श्री कंट्रोल चौक, जी एस पी एम कॉलेज परिसर अनेक ठिकाणी वर्षभर रस्त्यावर ड्रेनेज वाहतात. ग्रामपंचायत ने केलेली ड्रेनेज लाईन ही लहान व्यासाची आहे. मात्र वाढलेल्या नागरिकीकरणामुळे ह्या लाईन सातत्याने चोकअप होतात. परिणामी रस्त्यावर ड्रेनेज वाहतात.

या भागातील येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना व लहान मुलांना मैला मिश्रित पाण्यातून वाट काढत जावे लागते. ही मोठी शोकांतिका वाटते. यापासून अनेक आजार उद्भवू शकतात. मात्र नवीन ड्रेनेज लाईन मंजूर करण्यासाठी निधीची कमतरता असल्याचे दिसून येते.

या भागातील ड्रेनेजसाठी निधीची गरज भासत आहे. प्रशासनाकडून पावले उचलणे गरजेचे आहे.

**कचऱ्याची समस्या :** नऱ्हे परिसरातील नागरिकांना पूर्वी ग्रामपंचायतीमार्फत घंटा गाडी मार्फत कचरा उचलला जात असायचा. मात्र पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झाल्यानंतर स्वच्छ या संस्थेला या भागातील कचरा संकलनाचे काम देण्यात आले.

मात्र त्यावेळेस पासून अनेक भागात रस्त्यावर, निर्जन ठिकाणी कचऱ्याचे कचऱ्याचे ढीग साचत आहे.

**नऱ्हे on the spot**

अनेक नागरिक हे उघड्यावर कचरा टाकतात. ह्यासाठीही मोठी उपाययोजना करावी लागणार आहे.

त्याशिवाय कचरा वर्गीकरणाच्या ठिकाणीही प्रचंड मोठी दुर्गंधी येत आहे. त्यामुळे स्वच्छ संस्थेपेक्षा पूर्वीच्या प्रचलित पद्धतीने कचरा संकलन करावा अशी मागणी ही पुढे येत आहे.

**रस्त्यावर पडलेले खड्डे :** नऱ्हे ते गोकुळ नगर, भूमकर चौक ते श्री कंट्रोल चौक, सेल्फी पॉईंट परिसर, विविध भागांमध्ये रस्त्यावर पडलेले खड्डे हे नागरिकांची परीक्षा घेत आहेत.

रस्त्यावरून खळखळ वाहणारे पाणी आणि खड्डे याचा सामना करत नऱ्हेकर आपला प्रवास करत आहेत.

पालिका प्रशासनाने अनेक वेळा डांबर मिश्रित मटेरियल पासून खड्डे भरले आहेत. मात्र सध्या पावसाळा असल्यामुळे आणि खड्डे पुन्हा उघडे पडले आहेत.

यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या भागामध्ये शैक्षणिक संस्था व रहदारीचे मोठे क्षेत्र असल्यामुळे या भागातील रस्त्यावरती खड्डे चर्चेचा विषय ठरत आहेत.

**सततची वाहतूक कोंडी; नऱ्हेकर त्रस्त :** नऱ्हे परिसरातील नागरिकांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. नऱ्हे ते धायरी फाटा, भुमकर चौक श्री कंट्रोल चौक, सेल्फी पॉइंट गंधर्व चौक ह्या रस्त्यावर वर्दळीच्या वेळी सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे.

वाहनांची संख्या वाढली असली तरीही वाहतुकीचे नियोजन ही नसल्याचे दिसून येते.

रस्त्यावर अतिक्रमित बांधकामे, लाईट पोल इतर काही अडचणी दूर करून या भागातील वाहतूक कोंडी सोडवता येईल.

गर्दीच्या वेळी मोठ्या जड वाहनांना या भागात प्रवेश नाकारण्यात यावा. यामुळेही निश्चित वाहतूक कोंडी कमी होईल. या भागातील चाकरमानी व विद्यार्थी यांना मोठा त्रास वाहतूक कोंडीमुळे होत आहे.

**स्वच्छतागृहाचे अभाव :** नऱ्हे परिसरात भैरवनाथ मंदिर येथे एक स्वच्छतागृह उभारण्यात आले आहे. ह्याच्या व्यतिरिक्त कोठेही स्वच्छतागृह नाही. त्यामुळे नागरिकांना तसेच महिलांना मोठा त्रास सहन करावा लागतो. स्वच्छतागृह आहे त्यामध्येही स्वच्छतेची वानवा असल्याचे चित्र दिसते. स्वच्छतागृह हे वाढली पाहिजे किमान तीन स्वच्छतगृहांची आवश्यकता आहे. पालिका प्रशासनाने यासंबंधी निर्णय घेणे गरजेचे आहे. लहान मुलांसाठी क्रीडांगण, किंवा बगीचा कमतरता नऱ्हे परिसरातील नागरिकांना पूर्वी सेल्फी पॉईंट परिसर हा परिसर व्यायाम व विरंगुळ्यासाठी खुला होता. आता मात्र त्याचीही दुरावस्था झाली आहे. त्यामुळे या भागातील बालकांना व वृद्ध लोकांसाठी छोटासा का होईना एक बगीचा, मैदान व्हायला हवे अशी नागरिकांची भावना आहे.

## बस थांबे हवेत

ह्या भागात एक ही बस थांबा नाहीत. या भागातून शहरांमध्ये जाणारे विद्यार्थी नोकरदार वर्ग हा बसणे प्रवास करतो. त्यामुळे त्यांची प्रवासी संख्या मोठी आहे. मात्र या भागात कोठेही बस थांबे नसल्यामुळे त्यांची मोठी गैरसोय होत आहे. रस्त्यावर एका बाजूला बसची वाट पाहत या प्रवाशांना उभारावे लागते. त्यामुळे वृद्ध व महिला यांना त्रास होतो. यामुळे या भागामध्ये किमान आठ बस थांबे थांबायला हवेत. जेणेकरून प्रवाशांना सुखकर प्रवास होईल.

## पालिका प्रशासनावर अतिरिक्त तणाव

पुणे महानगरपालिकेचे क्षेत्र मोठे असल्यामुळे या भागातील सेवा सुविधा पुरवण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडे तोकडी यंत्रणा असल्याचे सिद्ध होते.क्षेत्रफळ मोठे असल्यामुळे मनुष्यबळ व यंत्रणा आवश्यक नसल्यामुळे अनेक कामे खोळंबली जात आहेत.याशिवाय महानगरपालिकेकडे प्रशासकाकडे कारभार असल्यामुळे कोणतेही ठोस नियोजन करता येत नसल्याचे चित्र दिसून येते. आगामी काळामध्ये पुणे महानगरपालिकेची नवीन बॉडी अस्तित्वात आल्यानंतर हे चित्र बदलेल अशी अपेक्षा नागरिकांना वाटत आहे. नऱ्हे परिसर हा एक पुण्यातील दक्षिण भागातील एक नावाजलेला परिसर. त्या वेळेच्या परिस्थिती आणि आत्ताची परिस्थिती यामध्ये खूप बदल झाले आहे. भागातील नागरिक यांनी आरंभपर्वकडे भावना व्यक्त करताना या भागातील विकास करण्याच्या अगोदर रस्ते पाणी ड्रेनेज या सुविधा देण्यासाठी प्राधान्यक्रम द्यावा अशी मागणी केली आहे. व आगामी काळात मूलभूत सुविधा देणाऱ्या लोकप्रतिनिधींना निवडून देण्याचा चंग नऱ्हेकरानी बांधला असल्याचे या निमित्त दिसून आले.सध्या महानगरपालिका निवडणुकीचा माहोल सुरू असताना नऱ्हेकर कुणाला साथ देतात ते पहाणे महत्वाचे आहे.

## नेते म्हणतात...



मुळात आम्ही मनपामध्ये जाऊन चूक केली की काय असा प्रश्न पहिल्यांदा मला पडतो. ह्या भागातील नागरिकांचे प्रश्न हे पूर्वीपेक्षा भयंकर वाढलेली आहे. आज पर्यंत एवढ्या समस्या असताना लोकप्रतिनिधींनी काहीही ठोस भूमिका घेतली नाही. किती समस्या आ वासून नागरिकांच्या जीवनावर परिणाम करत आहेत. लोकांच्या आरोग्य धोक्यात आले आहे. कोणतीही सोयी सुविधा या भागात नाही. या भागातील समस्येसाठी आमरण उपोषण केले मात्र अजूनही ठोस कारवाई होत नाही. प्रशासनाने दखल न घेतल्यास उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल.

**- भूपेंद्र मोरे, सामाजिक कार्यकर्ते**



आम्ही ग्रामपंचायत मध्ये सत्ता असताना ग्रामपंचायतीमार्फत सुंदर नऱ्हे ही संकल्पना राबवून ह्या परिसराचा विकास करण्याचं धोरण आम्ही आखले होते. त्यादृष्टीने आम्ही कामगिरीही चांगली केली. अनेक रेंगाळलेले रस्ते पूर्ण केले. कोट्यवधी रुपयाची कामे केली. मात्र वाढलेल्या नागरिकीकरणामुळे विविध समस्या वाढल्या आहेत. आ. भीमराव तापकीर यांच्यामार्फत तसेच शासन व पुणे मनपा यांच्या मार्फत आगामी काळामध्ये ही या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले जातील. ह्या भागातील नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी मी कटिबद्ध राहील. याची खात्री देतो.

**- सागर भूमकर, माजी सरपंच, नऱ्हे**



नऱ्हे परिसरातील समस्या ह्या नक्कीच वाढलेल्या आहेत. प्रशासनाकडून वारंवार दुर्लक्ष होत आहे. या भागातील प्रश्न मांडायचे म्हटले तर वेळ पुरणार नाही एवढे प्रश्न या भागात तयार झाले आहेत. त्यावर प्रशासन दिरंगाईची भूमिका घेत आहे. कोणतीही ठोस कारवाई होत नाही.खा. सुप्रियाताई सुळे यांच्यामार्फत प्रश्न सोडण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. आगामी काळामध्ये ही या भागाच्या विकासासाठी प्रयत्न करणार आहे .

**- पोपटराव खेडेकर, माजी सरपंच**




मी गेल्या अनेक वर्षापासून या भागांमध्ये कार्यरत आहे. ह्या भागातील नागरिकांना विविध समस्या सातत्याने भेडसावत आहे. ह्या भागात अनेक कामे व्हायला हवी. नागरिकांना पाणीपुरवठा मिळायला हवा. आम्ही खा. सुप्रियाताई सुळे यांच्यामार्फत अभिनव कॉलेज ते नंदनवन सिटी हा रस्ता व स्टेटलाईट मंजूर करून काम पूर्ण करून घेतले. अशी कामे व्हायला हवी.

**- प्रभावती भूमकर, माजी सभापती हवेली**





श्री कंट्रोल चौक, पारे कंपनी परिसरात रस्त्यावर खड्डे व साचलेल्या पाण्यातून नागरिकांना प्रवास करावा लागतो आहे.



भुमकर ब्रिज जवळ सर्विस रोडवर पडलेले खड्डे



वेताळ बुवा चौकात नियोजना अभावी रस्त्यावर साचले पाणी



जी एस पी एम कॉलेजकडे जाणाऱ्या रस्त्याची अवस्था



सिद्धार्थ प्रेस्टीज सोसायटी परिसरात ड्रेनेजचे पाणी





कृष्णाईनगर परिसरातील ड्रेनेजमधून पाणी वाहते. नागरिकांना मोठा त्रास होत आहे.



गंधर्व चौक परिसरात रस्त्यावर खड्डे, व संरक्षक कठडे नसल्यामुळे अपघाताचा धोका आहे

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.